# महाराजा सयाजीराव गायकवाड: मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षणविषयक कार्य

**डॉ. विद्या एन. जाधव**
*असोसिएट प्रोफेसर*
*विठ्ठलराव हांडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक*
*आणि*
**डॉ. सुजाता पी. पवार**
*असिस्टंट प्रोफेसर*
*पी. व्ही. जी. कॉलेज ऑफ एज्युकेशन, नाशिक*

**प्रास्ताविक**

एकोणिसावे शतक हे भारतीय इतिहासातील एक महत्त्वपूर्ण शतक म्हणून ओळखले जाते. या शतकात ज्ञान-विज्ञान, तंत्रज्ञान, कला, संस्कृती, धर्म, राजकारण, शिक्षण इत्यादी विषयात प्रचंड वैचारिक जागृती घडून आली. विसाव्या शतकाचा विचार केला तर कमालीचे अज्ञान होते. त्याचा फायदा समाजातील काही उच्चभ्रू व इंग्रज घेत होते. अंधश्रद्धा, जातिभेद, गुलामगिरी, विषमता व अज्ञान यांनी भारतीय समाज ग्रासलेला होता. उच्चभ्रूंची गुलामगिरी झुगारून द्यायची असेल व समाजातील दोष नाहीसे करायचे असतील तर सर्वप्रथम शैक्षणिक व वैचारिक जागृती होणे आवश्यक आहे ही जाणीव समाजसुधारकांमध्ये निर्माण झाली. यामध्ये महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. आंबेडकर ,भाऊराव पाटील, विठ्ठल रामजी शिंदे, लोकमान्य टिळक, दादाभाई नौरोजी, नामदार गोखले, योगी अरविंद, महात्मा गांधी यांची नावे प्रामुख्याने समोर येतात. या सर्व प्रज्ञावंतांना भक्कम वैचारिक व आर्थिक पाठबळ लाभले ते बडोद्याचे महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे.

**सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण योजना** सक्तीचे प्राथमिक शिक्षण योजना प्रायोगिक तत्त्वावर महाराजांनी प्रथम अमरेली गाव आणि तालुका यातील नऊ खेडेगावात सुरू केली. शाळेच्या एक मैल परिसरात राहणाऱ्या सात ते बारा वर्षांमधील मुले आणि सात ते दहा वर्षांमधील मुली यांना शाळेत जाणे सक्तीचे करण्यात आले. ज्यांना खासगी शिक्षण देण्यात येत होते अशांना व सक्तीच्या शिक्षण विषयक निश्चित केलेल्या इयत्तेत पूर्वीच उत्तीर्ण झालेल्यांना अथवा इतर काही नियम असतील अशांना या नियमाला अपवाद ठरविण्यात आले. पहिल्या तीन इयत्ता यावेळी सक्तीच्या करण्यात आल्या होत्या. नोव्हेंबर १८९३मध्ये हा हुकूम लागू करण्यात आला. हा कायदा सक्तीचा असला तरी सुरुवातीला शाळेत गैरहजर राहण्याबद्दल कोणतीही शिक्षा केली जात नसे. महाराजांना असा विश्वास होता की कायदेशीर शिक्षेने प्रश्न सुटणार नाही आपण आपल्या उद्दिष्टांकडे सावकाश मार्गक्रमण केले पाहिजे.

**योजनेचे उद्दिष्ट** सक्तीच्या शिक्षण योजनेमागे बडोदा राज्यातील प्रत्येक मुलाला कमीत कमी तीन आर प्राप्त झाले पाहिजे (रीडिंग, रायटिंग, अर्थमॅटिक) असे ते म्हणत. जात पद्धत टिकून राहण्यासाठी काही जणांनी शिक्षण शिक्षण मूठभर लोकांना पुरताच मर्यादित ठेवले दुसऱ्या बाजूने पाहता त्याची कल्पना खालून वर अशा स्वरूपाची होती असे ते म्हणाले लोकसमुदायाला प्राथमिक शिक्षण द्या तेव्हा अधिक ची मागणी मागोमाग लगेच येईल. अशा तऱ्हेची मागणी ज्यावेळेस निर्माण होईल त्यावेळेस योग्य मार्गदर्शन झाले पाहिजे.हा प्रयोग समर्थनीय ठरला आणि इ.स. 1906 च्या कायद्यानुसार खालील प्रकारच्या विद्यार्थ्यांना शाळेतील सक्तीच्या उपस्थित सूट

देण्यात आली. **१)** वाढलेले वय **२)** शारीरिक दुर्बलता **३)** विद्यार्थ्यांची शारीरिक आणि मानसिक दुर्बलता **४)** शाळेपासून एक मैलापेक्षा अधिक अंतर **५)** कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी असणारा एकमेव घटक **६)** आवश्यकता किमान इयत्ता उत्तीर्ण झालेला असणे **७)** निर्धारित वयापेक्षा अधिक वय असणे.

या सर्वांना कायद्यातून सूट देण्यात आली. शाळेचे प्रवेश घेण्याची वय सुरुवातीला मुलांसाठी सात ते बारा आणि मुलींसाठी सात ते दहा ठरविण्यात आले होते परंतु १९१३ ला ते मुलांसाठी १४ व मुलींसाठी १२ असे वाढविण्यात आले. सुरुवातीला कोणताही दंड आकारला जात नव्हता परंतु शाळेतील अनुपस्थिती बघून एक महिन्यातील कामाच्या दिवसांपैकी दोन तृतीयांश दिवस गैरहजर राहिल्यास विद्यार्थ्यास शिक्षा पात्र ठरविण्यात आले. शेतावर जेव्हा कामाचा अधिक भर असेल तेव्हा शेतकऱ्यांच्या मुलांना (एका सत्रात 45 दिवसांपेक्षा जास्त दिवस गैरहजर नसल्यास) गैरहजर राहण्याची कायदेशीर परवानगी देण्यात आली. गैरहजर राहिल्याबद्दल करण्यात येणाऱ्या दंड आकारण्याचा अधिकार प्रथम महसूल खात्याकडे सोपविण्यात आला होता पण नंतर इ.स. १९१४ तो स्थानिक मंडळ आणि म्युनिसिपालिटी यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. जमा केलेली रक्कम शाळेच्या इमारती बांधण्यासाठी आणि गरजू मुलांना मदत करण्यासाठी वापरण्यात येत होती. तसेच जो दंड सरकारतर्फे जमा करण्यात येत असे त्या जमा केलेल्या रक्कमेचा पाच टक्के भाग दंड जमा करण्याचा मोबदला म्हणून तलाठी आणि पटेल यांना देण्यात येई. ३५ टक्के भाग गरीब आई-वडिलांच्या इमारतीच्या बांधकामासाठी वापरण्यात येत असे. ( Compulsory Education Act, Government of His Highness The Maharaj Gaekwad of Baroda, 1935) . सक्तीच्या शिक्षण योजनेचे प्रशासकीय मूल्यांकन केल्यानंतर इ.स. १९१४ मध्ये त्यात फेरफार करण्यात आले. सक्तीच्या शिक्षण कायद्याचे कामकाज कसे चालते आहे याचा तपास करण्यासाठी एक इ,स. १९१६ मध्ये एका समितीची नेमणूक करण्यात आली. समितीच्या हे लक्षात आले की, सक्तीचे मोफत शिक्षण योजनेने खरोखर काय कामगिरी केली व तिच्यामुळे कोणते लाभ झाले. हजेरी पत्रकावर असणारी अनेक मुले वर्षानुवर्षे पहिल्या इयत्तेच्या पुढे गेलीच नाहीत. म्हणून शाळेत दाखल करण्याचे कमीत कमी वय सात वर्षे ठरविण्यात आले. शाळेचे हजेरीपत्रक तपासण्यासाठी संख्याशास्त्राच्या सुधारित पद्धतीचा वापर करण्यात आला प्राथमिक शिक्षणाच्या धोरणानुसार सर्वात महत्त्वाची घटना म्हणजे प्राथमिक शिक्षणाच्या कार्यपद्धतीचे सुसूत्रीकरण करण्यात आले. अकार्यक्षम शाळा बंद केल्या अथवा त्यात सुधारणा केल्या. महत्त्वाच्या विषयांसाठी प्रशिक्षित शिक्षण प्रक्रियेवर भर देण्यात आला.

**मुलींसाठी मोफत प्राथमिक शिक्षण** इ.स. १८९३ मध्ये अमरेली गाव आणि तालुका व त्या अंतर्गत येणारे खेडी या ठिकाणी प्रायोगिक तत्त्वावर सक्तीच्या प्राथमिक मोफत शिक्षण योजनेची ओळख करून दिली १८९३ला शाळेच्या एक मैलाच्या परिसरात राहणाऱ्या सात ते दहा वर्षे या दरम्यानच्या मुलींना शाळेत येणे सक्तीचे करण्यात आले.( Administrative report of Baroda state 1982-83, Pg.107) सरकारने वेळोवेळी निश्चित केलेल्या विशिष्ट इयत्तेइतके शिक्षण घेतले पाहिजे ही हि अट होती. मुले-मुली मिश्र शिक्षणाचा प्रयोगही राबविण्यात आला. दहा वर्षाच्या वरील मुलींना शाळेकडे अधिकाधिक वळविण्यासाठी प्रलोभन म्हणून शिष्यवृत्ती योजना सुरू केली. इ.स. १९०४ मध्ये ५२ खेड्यात सक्तीचे प्राथमिक शिक्षण योजना पसरली होती. इ.स.१९१३ मध्ये भाव नगरचे महाराजांनी मुलींच्या शाळेला प्रत्येकी एक हजार रुपये प्रमाणे देणग्या दिल्या. या रकमेच्या व्याजातून प्रत्येक वर्षी सुवर्णपदक व सोन्याचे मंगळसूत्र देण्यात येई. इ.स.मध्ये शाळेसाठी वयोमर्यादा बारा इतकी आणि सक्तीच्या इयत्तेची मर्यादा पाचवी इयत्तेपर्यंत करण्यात आली. ( महाराजा सयाजीराव गायकवाड आणि स्त्रीशिक्षण, मंदा हिंदुराव, २०१५, पृ.१०५,१०७) ( Baoda Administration Report 1912-13, Pg.131). इ.स.१८७५ मध्ये दोन कन्या शाळा होत्या तर १८८९-९० साली त्या ३५ झाल्या.सन १८९९-१९०० मध्ये त्यांची संख्या ३४७ पर्यंत गेली. सन. १८८९-९० मध्ये विद्यार्थिनींची संख्या

३१४५ झाली. स. १९१० मध्ये ५४४७९ वर गेली तर १९२६-२७ मध्ये एकूण ६९४७९ वर गेली होती (महाराजा सयाजीराव गौरवगाथा युगपुरुषाची, लेखक- सदाशिव विनायक देशपांडे, पृ.८१) **मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचे महत्त्वाचे पैलू**

**१)** शिक्षण हेच प्रगती आणि परिवर्तनाचे एकमेव साधन आहे त्याकरिता शिक्षण हे रयतेला दिले पाहिजे असे महाराजांचे मत होते म्हणून त्यांनी इ.स.१८८२ साली अस्पृश्य, आदिवासी, वंचित समाजासाठी सरकारी खर्चाने सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण देण्याचा हुकूम काढला. वंचित समाजाला उन्नत करण्याचा हा जगातील महत्त्वाचा सामाजिक क्रांतीचा निर्णय आहे. इ.स. १८९२ मध्ये मोफत सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची सुरुवात केली. त्यांची ही दूरदृष्टी तत्कालीन जगासमोर अग्रेसर शासन प्रणाली ला मागे टाकणारी होती. शिक्षणासाठी खर्च होणाऱ्या रकमेच्या पाऊण भाग रक्कम प्राथमिक शिक्षणासाठी खर्च करत.

**२)** मोफत प्राथमिक शिक्षण योजना राबविणारे बडोदा हे भारतातील पहिले शहर ठरले.

**३)** सक्तीचे मोफत प्राथमिक शिक्षण राबविताना या योजनेसाठी प्रथम अंदाजपत्रक तयार करण्यात आले. या योजनेमध्ये प्रत्येक जाती जमातीच्या मुलामुलींना मोफत शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्याचा आदेश होता. या योजनेस प्रतिसाद दिला नाही तर पालकांना शिक्षा केली जाईल असे ठरविण्यात आले. त्यावेळी संपूर्ण राज्याला येणारा खर्च बारा पंधरा लाख इतका येत होता. एवढ्या मोठ्या शैक्षणिक योजनेचे ओझे राज्याला पेलता येईल की नाही हे निश्चितपणे समजल्याशिवाय कोणतेही धोरण आखले नाही. परंतु महाराजांनी आखलेली योजना यशस्वी ठरली. त्यानंतर मोफत सक्तीच्या शिक्षणाचा कायदा करण्यात आला म्हणजे अतिशय सुनियोजितपणे शिक्षण विषयक योजना राबविण्यात महाराजांचा हातखंडा होता.

**४)** प्राथमिक सक्तीचे मोफत शिक्षण योजना राबविण्यात आली त्यावेळी राज्याचे शिक्षणमाला तयार करून घेतली. वाचन पुस्तके तयार करताना वय, बुद्धी, क्षमता याचा अंदाज घेतला जावा अशी व्यवस्था केली, मुलांची ज्ञानाबद्दलची रुची वाढावी म्हणून पाठ्यपुस्तके, आशय रचना सोपी, सुंदर व आशयदृष्ट्या संपन्न असावी. विज्ञान शिक्षणाची भाषा सोपी असावी, जेणेकरून मुलांना शाळेत घेण्यासाठी सक्ती करावी लागणार नाही. त्यांना ते शिक्षण आनंददायी वाटेल अशा बारीकसारीक गोष्टींचा विचार महाराजांनी केलेला दिसतो.

**५)** ज्ञानाशिवाय आपली प्रगती होऊ शकत नाही. उच्च आणि कनिष्ठ, गरीब आणि श्रीमंत हे सर्वच आपली वास्तविक स्थिती ओळखण्याचा विवेक शिकले पाहिजेत. त्यांच्या नवनिर्मिती, नवविचार आणि नवीन शिक्षणाला सतत प्रोत्साहन दिले पाहिजे याबाबत महाराज आग्रही होते. भावी काळाचा वर्तमानाशी साधा जोडणारा हा अत्यंत प्रगत शैक्षणिक विचार होता. सक्तीचे मोफत शिक्षण ही जगात घडलेली पहिली क्रांतीकारक घटना मानावी लागेल.

**६)** प्राथमिक शिक्षणाच्या धोरणानुसार १९३१-३२ या वर्षातील सर्वात महत्त्वाची घटना म्हणजे प्राथमिक शिक्षणाच्या कार्यपद्धतीचे सुसूत्रीकरण करण्यात आले. अकार्यक्षम शाळा बंद करण्यात आल्या किंवा सुधारणा करण्यात आल्या. एक शिक्षकी शाळा बंद करून महत्त्वाच्या विषयांसाठी प्रशिक्षित शिक्षण प्रक्रियेवर भर देण्यात आला. म्हणजे अतिशय सूत्रबद्धता व सुनियोजितपणे योजना राबविण्यात आली. मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा आर.टी.ई. राबविण्यात येत आहे, तरीही 100% साक्षरता दिसून येत नाही. शिक्षणतज्ञ जे. पी. नाईक हे म्हणाले होते, की मोफत सक्तीचे प्राथमिक योजना राबविताना बडोदा नरेश सयाजीराव गायकवाड यांनी राबविलेल्या धोरणांचा वापर करावा. किती तरी खर्च या योजनेवर करण्यात येतो. काही बाबींची कडक अंमलबजावणी केली तर शंभर टक्के चांगले फलित मिळणार आहे. अशारितीने त्यांचा शिक्षणप्रसाराचा व्याप किती अफाट होता हे दिसून येते.

**संदर्भ:**

पवार, निंबाजीराव (२०१६). 'जेव्हा गुराखी राजा होतो'.पुणे: राजहंस प्रकाशन प्रा.ली.
हिंगुराव, मंदा (२०१५). 'महाराजा सयाजीराव गायकवाड व स्त्री शिक्षण'औरंगाबाद: साकेत प्रकाशन
भांड, बाबा. (२०१७). ' युगदृष्टा महाराजा सयाजीराव गायकवाड ' औरंगाबाद: साकेत प्रकाशन
आपटे, दाजी नागेश (१९३६). 'श्री महाराजा सयाजीराव तिसरे यांचे चरित्र ' खंड २ रा (इ.स.१८८७-१९११) बरोडा.
पवार, एस.पी.( २०२०).महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या शिक्षणविषयक विचारांचा अभ्यास' पुणे विद्यापीठ, पुणे.
Free and Compulsory primary Education Act 1913, Baroda State.